# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 07 December 2024

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०७ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

विधानसभेचं तीन दिवसीय विशेष अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. २८८ नवनिर्वाचित विधानसभा सदस्य विधानभवनात दाखल होत असून विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर त्यांना पदाची शपथ देतील. दरम्यान राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या १६ से २१ डिसेंबर या कालावधीत नागपूर इथं होणार आहे.

****

सक्तवसुली संचालनालय इडीने मुंबई आणि गुजरातमधल्या अहमदाबाद इथं एकूण सात ठिकाणी आज छापा टाकला. या छाप्यांमध्ये साडे तेरा कोटी रुपयांची रोख रक्कम ईडीनं ताब्यात घेतली. ही रोख रक्कम मालेगाव इथल्या नाशिक मर्चंट सहकारी बँकेच्या घोटाळ्या संबंधित प्रकरणाची आहे.

नाशिक मर्चंट सहकारी बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्रानं २१ जणांच्या खात्यात बेकायदेशीर पद्धतीनं ही रक्कम जमा केली होती. या २१ खात्यांमध्ये शेकडो कोटी रुपये ऑनलाईन पद्धतीनं या बँकांनी जमा केल्यानंतर बनावट नावांनी खातं असलेल्या २१ जणांनी आपल्या खात्यातून रोखीनं काढून घेत गेल्या महिन्यात हवालाच्या माध्यमातून गुजरातच्या अहमदाबाद, सुरत आणि मुंबईत हवाला चालवणाऱ्याना अंगडिया प्रणालीनं हस्तांतरित केले होते.

****

आयएनएस तुशील ही अत्याधुनिक बहुउद्देशीय मार्गदर्शित क्षेपणास्त्र युद्धनौका येत्या नऊ डिसेंबरला नौदलात सामील केली जाणार आहे. या समारंभाला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून रशिया आणि भारताचे संरक्षण अधिकारी देखील सहभागी होतील. तुशील, याचा अर्थ 'संरक्षक कवच' असा असून ही नौका रशियामध्ये तयार करण्यात आली आहे.

****

संयुक्त राष्ट्र अमली पदार्थ आयोग सीएनडीच्या अडुसष्ठाव्या सत्राच्या अध्यक्षपदी भारताची निवड करण्यात आली आहे. वियान इथले भारताचे प्रतिनिधी शंभु कुमारन यांनी आज अधिकृतरित्या या अध्यक्षपदाची सुत्रं स्वीकारली.

सीएनडी ही संयुक्त राष्ट्राची अमली पदार्थांशी संबंधित प्रकरणांसाठीची प्रमुख धोरण आखणारी संस्था असून जगभरातल्या अमली पदार्थ आणि त्याच्या परिणामांवर निगराणी करणं, यासंबंधीत संतुलित धोरणांची आखणी करण्यात सदस्य देशांचं समर्थन करणं तसंच प्रमुख आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ निर्माण करणाऱ्या संघटनांच्या संमेलनांच्या कार्यान्वयांची देखरेख करणं हे या संस्थेचं कार्य आहे. भारत प्रथमच सीएनडीचं अध्यक्षपद भूषवत आहे.

****

भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील सानगडी नजीक असलेल्या सिरेगाव टोला इथं दुचाकीवर जाताना मोबाईल फोनचा स्फोट होऊन एकाचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाल्याची घटना काल घडली.

जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक पदावर कार्यरत सुरेश संग्रामे आणि त्यांचा मित्र नत्थु गायकवाड हे दोघे दुचाकीवरुन जात असतात खिशात मोबाइल फुटला. स्फोट झाल्यानंतर कपड्यांना आग लागली आणि संग्रामे होरपळले. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दुचाकीवरचं नियंत्रण सुटल्याने मागे बसलेले नत्थु गायकवाड खाली पडल्यामुळे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

****

नंदुरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुवा तालुक्यातील देवगुई घाटात आज राज्य परिवहन मंडळाची बस उलटून भीषण अपघात झाला. या अपघातात कुठलीही जीवीतहाणी झाली नाही.

****

अकोला जिल्ह्यात मसाला वर्गीय पिकांचे क्षेत्र वाढवण्यासाठी कृषी वसंत अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. या अनुषंगानं जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते म्हैसपूर इथं मसालावर्गीय पिकांच्या वाणांचं काल वाटप करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. अकोला जिल्ह्यात ७२० एकरावर मसालावर्गीय पिकांची प्रात्यक्षिकं सुरु आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मिरची आणि भाजीपाला संशोधन केंद्राच्या सहकार्यानं हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

****

दुबई इथं सुरु असलेल्या १९ वर्षाखालील पुरुषांच्या आशिया विश्वचषक स्पर्धेत उद्या रविवारी भारत आणि बांग्लादेश यांच्यात भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी साडे दहा वाजता अंतिम एकदिवसीय सामना होणार आहे. बांग्लादेशनं गेल्या वेळी संयुक्त अरब अमिरातला हरवत या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं होतं. भारतानं शारजाह इथं झालेल्या उपांत्य सामन्यात श्रीलंकेला सात गडी राखून नमवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

****

ॲडलेड ओव्हल इथं बॉर्डर-गावस्कर चषक स्पर्धेत भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघात सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा आस्ट्रेलियाच्या ३ गडी बाद १४३ धावा झाल्या होत्या. काल पहिल्या दिवशी भारतीय संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कनं सहा गडी बाद करत भारताचा डाव १८० धावांत संपुष्टात आणला. भारताकडून नितीश कुमार रेड्डी यानं सर्वाधिक ४२ धावा केल्या. भारतानं पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध २९५ धावांनी दणदणीत विजय मिळवत पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

****